# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,**

## कृषी हवामानशास्त्र विभाग



फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६/०९/२०२५

### जिल्हा :पुणे

**मागील आठवडयाचे हवामान :**

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २५.५ ते ३१.१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २०.९ ते २१.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८५ ते ९८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५७ ते ८७ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.५ ते ४.७ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान २५ ते २९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९३ ते ९८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ९० ते ९६ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०६ ते ०८ कि.मी. दरम्यान राहील. आकाश पूर्णतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०९/२०२५ ते १६/०९/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१६/०९/२०२५ ते २०/०९/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **10** | **11** | **12** | **13** | **14** | **15** | **16** | दिनांक | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 18.0 | 8.2 | 60.0 | 4.7 | पाऊस (मिमी) | 8 | 10 | 6 | 4 | 3 |
| 30.4 | 31.1 | 30.0 | 28.3 | 28.2 | 29.2 | 25.5 | कमाल तापमान(अं.से.) | 26 | 25 | 26 | 28 | 29 |
| 21.2 | 20.9 | 21.5 | 21.5 | 21.7 | 21.9 | 21.6 | किमान तापमान(अं.से.) | 22 | 22 | 22 | 21 | 21 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| 85 | 88 | 85 | 88 | 93 | 98 | 93 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 96 | 95 | 93 | 98 | 96 |
| 57 | 60 | 63 | 76 | 87 | 87 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 94 | 90 | 92 | 96 | 94 |
| 4.3 | 4.7 | 4.7 | 2.9 | 2.5 | 3.5 | 2.9 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 6 | 6 | 7 | 8 | 8 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 283 | 284 | 276 | 273 | 275 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी बऱ्याच (जिल्ह्याच्या सुमारे ५१-७५ %) ठिकाणी तर दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी काही (जिल्ह्याच्या सुमारे २६-५० %) ठिकाणी तर दिनांक १८, १९ व २० सप्टेंबर, २०२५ रोजी तुरळक (जिल्ह्याच्या सुमारे ०-२५ %) ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ जिल्ह्यात व घाट क्षेत्रात दिनांक १६, १७ व १८ सप्टेंबर, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास) , मेघगर्जना, विजासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ ते २७ सप्टेंबर, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर |

| | | |
|---|---|---|
| | | असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• पावसाळयामध्ये फवारणी करताना स्टिकर, मिनरल ओईल इ. वापरावे.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• सतत आणि अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे तण मोठ्या प्रमाणावर वाढतात आणि त्याच्या नियंत्रणासाठी ग्लायफोसेट ४१% ईसी २ ते ४ लिटर प्रति हेक्टर ५००-७०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा , स्टिकर वापरा आणि पाऊस नसताना फवारणी करा.<br>• रब्बी हंगामासाठी शेत तयार करावे जेणेकरून रब्बी पिकांची पेरणी वेळेवर करता येईल.<br>• सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे रोगांच्या नियंत्रणासाठी फळबागेमध्ये ०.५ ते १ टक्के बोर्डो ची फवारणी करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **भात** | पोटरी अवस्था | नवीन लागण केलेल्या भात खाचरात अधिक फुटव्याच्या अवस्थेत पाण्याची पातळी ३ ते ५ सें.मी. ठेवावी तसेच भात पोटरीच्या अवस्थेत असताना ५ ते १० से.मी. ठेवावी. सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे पाने गुंडाळणाऱ्या अळीचा व निळे भुंगेरे यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्लोरेंनट्रेनिलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मि.ली. किंवा फ्ल्युबेन्डॅमाईड ३९.३५ एस.सी. १ मि.ली. किंवा फिप्रोनील ५ एस.सी. २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. भातावरील करपा आणि पर्ण करपा रोगांच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के इ.सी. २० मिली प्रति १० लिटर पाणी मिसळून फवारावे. पर्ण करपा रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपीकोनॅझोल २५ टक्के ई.सी. ६.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **कापूस** | फुले उमलणे ते बोंडे लागण | पिकावरील मावा व तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी , क्रायसोपा अंडी ५००००/- प्रति हेक्टरी पिकावर सोडावीत , फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन २५ एससी २० मिली किंवा डायफेन्थुरॉन ५० डब्ल्युपी १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारावे. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी मेटारायाझीयम अनिसोप्ली ५० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून आळवणी करावी. आंतरमशागतीच्या वेळेस अळया गोळा करून नष्ट कराव्यात. पीक ८० ते ९० दिवसांचे झाल्यावर झाडाच्या मुख्य फांदीचा शेंडा खुडावा, यामुळे पिकाची कायिक वाढ मर्यादित राहते, सर्व बोंडाची वाढ चांगली होते. पिकात हवा खेळती राहते. बोंडे सडत नाहीत व कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| **ऊस** | पिक वाढीची अवस्था | तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. |
| **सोयाबीन** | शेंगा भरण्याची अवस्था | सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे पाने खाणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावा तसेच प्रकाश सापळयांचा ही शक्य झाल्यास वापर करावा. तसेच नियंत्रणासाठी फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७० % एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मका** | तुरा बाहेर पडताना व फुलोर्या त असताना अवस्था | उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| **तूर** | फांद्या फुटण्याची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळी व स्पोडोपटेरा अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा निंबोळीयुक्त किटकनाशक अॅझाडिरेक्टीन ०.०३ टक्के (३०० पी.पी.एम.) ५ मि.ली. प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के एस.सी. प्रवाही ७ मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी. ३ मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात सकाळी वारा शांत असताना स्टिकर १ मि.ली. मिसळून प्रती लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मूग** | पक्वता अवस्था | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **उडीद** | पक्वता अवस्था | उडीद पिकाच्या च्या ७० % शेंगा परिपक्व झाल्यानंतर व पावसाची उघडीप मिळाल्यानंतर लगेच काढणी करावी. काढणी एक किंवा दोन टप्प्यांमध्ये करावी जेणेकरून दाणेगळ होणार नाही. पावसाची शक्यता असल्याने वेळेवर पेरणी केलेल्या पक्व खरीप उडीद पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **भाजीपाला पीके** | | खरीप हंगामातील भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक |

| | | |
|---|---|---|
| | | नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **टोमॅटो** | पिक वाढीची अवस्था | फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली किंवा क्लोरेंनट्रॅनीलीप्रोल १८.५ % एस.सी. ३ मिली १० लिटर पाण्यात मिसळुन ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या पावसाची उघडीप बघून कराव्यात. |
| **वांगी** | पिक वाढीची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरून टाकावी तसेच ५ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रिन २५ % ई.सी. ४ मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २०% ई.सी. २० मिली. किंवा स्पिनोसॅड ४५% एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून साध्या हातपंपाने फवारावे. शेतामध्ये फळ पोखरणाऱ्या अळीसाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) वापरावेत. |
| **कांदा** | पिक वाढीची अवस्था | करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मिली १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन ११% + टेब्युकोनॅझोल १८.३% १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा किटाझेज ४८% इसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यातून १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. फवारणी करताना स्टिकरचा वापर करवा. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत. तसेच मेटीरम ५५ टके + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्लु जी) ३० ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. पीक काढणीच्या (निर्यात मालासाठी) अगोदर फवारणी करताना मिनरल ओईलचा वापर टाळावा. वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून काठीचा आधार द्यावा . पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. सध्याच्या ढगाळ हवामानामुळे फुलकिडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड ५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **द्राक्ष** | पीक वाढीची अवस्था | ढगाळ व पावसाळी हवामानामुळे द्राक्ष पिकावरील फुलकिड्यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५% एस.सी. २.५ मिली प्रति १० लि. पाणी किंवा फिप्रोनिल ८० डब्ल्यू.जी.०.६ मिली प्रति १० लि. पाणी या प्रमाणात दोन फवारण्या १० दिवसाच्या अंतराने द्याव्यात.<br>मिलीबगच्या नियंत्रणासाठी बागेतील तणे उपटून त्याचे नियंत्रण करणे, बागेत स्वच्छता राखणे तसेच पिवळया चिकट सापळयांचा वापर आणि रासायनिक नियंत्रणासाठी बुप्रोफेझीन २५% एस.सी. १५ मिली. अथवा लेकॅनीसीलीयम लेकॅनी ५० ग्रॅ. + ५० मिली दुध १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी (तापमान ३० सेंटीग्रेड पेक्षा कमी व आर्द्रता ६५ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक). |
| **आंबा** | | खोडाचे वेळोवेळी निरीक्षण करावे . खोडातून भुसा येताना दिसल्यास त्वरित नियंत्रणाचे उपाय करावेत . खोडकिडीचा प्रादुर्भाव झाला असल्यास पाने पिवळी पडतात . खोडाला पडलेल्या छिद्रातून भुसा बाहेर पडलेला दिसतो. पटाशीच्या साह्याने खोडाची प्रादुर्भावीत साल काढून अळीला बाहेर काढून मारून टाकावे . इंजेक्शनच्या मदतीने क्लोरपायरीफॉस (२० ईसी) ५० मि .ली. प्रति १० लिटर पाण्यात बनवून छिद्रात टाकावे. कापसाचा बोळा या द्रावणात बुडवून छिद्र बंद करावे.<br>नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांच्या जोडाखाली येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. कलमांचे बुंधे आणि आळी तण विरहित व स्वच्छ ठेवावीत. वाऱ्याचा वेग वाढल्यास कलमे कोलमडून पडू नयेत म्हणून मातीची भर द्यावी. नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा . अति घन लागवड केलेल्या बागेमध्ये पर्णगुच्छ होऊ नये म्हणून प्लानोफिक्स २०० पीपीएम चा वापर करावा. |
| **आफ्रिकन शंखी गोगलगाय नियंत्रण** | | पावसाळयातील ढगाळ वातावरण, कमी सूर्यप्रकाश, कमी तापमान, जमिनीतील भरपूर ओलावा आणि हवेत असणारी आर्द्रता आफ्रिकन शंखी गोगलगाय च्या वाढीसाठी अतिशय अनुकूल वातावरण आहे. आफ्रिकन शंखी गोगलगायीची पिल्लावस्था आणि प्रौढावस्था रात्रीच्यावेळी किंवा कमी सूर्यप्रकाशात मोठ्या संख्येने बाहेर पडून शेतातील कोबी , फ्लॉवर, मिरची, टोमॅटो, बटाटा, कपाशी, मका, ज्वारी, ऊसाचे नवांकुर, सोयाबीन, भात, वांगी, वेलवर्गीय भाज्या , पालेभाज्या इत्यादी विविध प्रकारच्या वनस्पतीची पाने , फुले आणि फळे खाऊन मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान करतात.<br>लहान गोगलगायीच्या नियंत्रणासाठी २० टक्के मिठाच्या द्रावणाची फवारणी करावी. शेताच्या अथवा बागेच्या कडेने सर्व बाजूनी ४ ते ५ इंच रुंदीचा तंबाखू पावडर किंवा चुन्याचा पट्टा टाकल्यास गोगलगायींना अटकाव होतो. पिकाच्या कडेनें सापळा पीक म्हणून झेंडूच्या पिकाची लागवड करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा. जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : १६.०९.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे